# राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
# बृहन्मुंबई खंडपीठ

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

## अपील क्र. MHSICMU/२०२२/M/०००६१५

**अपिलार्थी श्री. राजेंद्रकुमार किशनलाल जायस्वाल**

**विरुद्ध**

**जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक राज्यकर आयुक्त (नोडल-१)**

सहाय्यक राज्यकर आयुक्त (AST-D-८०१)(नोडल विभाग-१), मुंबई यांचे कार्यालय,
०५ वा मजला, ई-विंग, केबिन क्र.ई-६, नवीन इमारत, वस्तु व सेवाकर भवन, मुंबई -४०० ०१०.

**प्रथम अपिलीय अधिकारी तथा राज्यकर उप आयुक्त (ई-८०१)**

राज्यकर आयुक्त (AST-D-८०१)(नोडल विभाग-१), मुंबई यांचे कार्यालय,
०५ वा मजला, ई-विंग, केबिन क्र.ई-६, नवीन इमारत, वस्तु व सेवाकर भवन, मुंबई -४०० ०१०.

**द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : २३.०४.२०२४**

अपीलकर्ता : अनुपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित
प्रथम अपिलीय अधिकारी : उपस्थित

| मूळ अर्ज दिनांक | जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक | प्रथम अपील दिनांक | प्रथम अपील आदेश दिनांक |
|---|---|---|---|
| १२.११.२०२१ | ०३.१२.२०२१ | १४.१२.२०२१ | २०.०१.२०२२ |

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. ०७.०२.२०२२ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळालेली नाही, असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. ०३.१२.२०२१ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. २०.०१.२०२२ संलग्न केले आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांचा माहिती अर्ज दि. १२.११.२०२१ अन्वये आपल्या कार्यक्षेत्रात येणाऱ्या सर्व परवाना धारकांची यादी व सी.एल.-१, सी.एल.-२, सी.एल.-३, एफ.एल.-१, एफ.एल.-२, एफ.एल.-३, परमिट रुम आणि बिअर शॉपी परवाना धारकांची व्हॅट (सी.एस.टी) आणि जी.एस.टी नंबर घेतले असल्यास त्यांची संपूर्ण यादी व न घेणाऱ्यांची यादी देण्यात यावी, अशी माहिती विचारलेली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी त्यांचे पत्र दि. ०३.१२.२०२१ अन्वये अपिलार्थी यांना आपण मागणी केलेली माहिती मागणी केलेल्या स्वरुपामध्ये उपलब्ध नाही. वस्तू व सेवाकर विभागामध्ये सर्व धारिण्या वेगवेगळ्या नोडल अधिकारी यांच्याकडे नियंत्रण व कार्यवाहीकरिता असतात नेमक्या कोणत्या व्यापाऱ्यांची माहिती हवी आहे हे मुद्देसूदपणे या कार्यालयांस अवगत केल्यास संबंधित अधिकाऱ्यांकडून माहिती मागवून त्याप्रमाणे निर्णय घेता येईल, असे कळविले आहे.

अपिलार्थी यांनी दि. १४.१२.२०२१ रोजी दाखल केलेल्या प्रथम अपील अर्जावर प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. २०.०१.२०२२ रोजी अपिलार्थी यांनी माहिती अर्जात मागणी केलेली माहिती मागणी केलेल्या स्वरुपात माहिती अधिकारी यांचे कार्यालयात उपलब्ध नाही, ही वस्तूस्थिती आहे. तथापि जनमाहिती अधिकारी, सहाय्यक राज्यकर आयुक्त नोडल-१ मुंबई यांनी जी माहिती अपिलार्थी यांना पुरविता येईल अशा स्वरुपातील या विभागातील उपलब्ध असलेली माहिती सर्व नोडल अधिकारी यांचेकडून एकत्रित करुन अपिलार्थी यांना १५ दिवसात पुरविण्यात यावी, असे आदेश पारीत केले आहेत.

..२/-

सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित असून जन माहिती अधिकारी व प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असे नमुद केले की, अपिलार्थींनी जी माहिती मागितली आहे ती या कार्यालयात उपलब्ध नाही, असे अपिलार्थींना दिनांक ०३.१२.२०२१ रोजीच्या पत्राने कळविले होते. त्यानंतर प्रथम अपिलाच्या आदेशानंतर अपिलार्थींना परत दिनांक ०७.०२.२०२२ रोजी उत्तर देण्यात आले की, आपण मागितलेली माहिती या कार्यालयात उपलब्ध नाही. परंतू अशी माहिती वस्तू व सेवाकर विभागाच्या www.mahagst.gov.in या संकेतस्थळावर Whats New मध्ये MVAT live dealer alongwith TIN as on 31/03/2020 येथे सार्वजनिक अधिक्षेत्रात उपलब्ध आहे असे कळविले आहे.

अपिलार्थी सुनावणीस अनुपस्थित आहेत. तथापि, त्यांनी दिनांक १९.४.२०२४ रोजी आयोगास त्यांचे लेखी निवेदन सादर केले आहे. त्यामध्ये त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी आजपर्यंत माहिती दिली नाही, असे नमूद केले आहे.

या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, जन माहिती अधिकारी यांचे म्हणणे आहे की, प्रथम अपिलाच्या आदेशानंतर अपिलार्थींना दिनांक ०७.०२.२०२२ चे पत्रान्वये त्यांना हवी असलेली माहिती विभागाच्या संकेत स्थळावर सार्वजनिक अधिक्षेत्रा उपलब्ध आहे असे कळविलेले आहे व संकेतस्थळाची माहितीही अपिलार्थींना दिली आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

## आदेश

**१. अपिलार्थींना माहिती देण्यात आली आहे. तरीही जन माहिती अधिकाऱ्यांनी दि. ०७.०२.२०२२ रोजी पाठविण्यात आलेल्या पत्राची प्रत पुन्हा अपिलार्थीस उपलब्ध करुन द्यावी.**

**२. अपील निकाली काढण्यात येत आहे.**

**मुंबई**
**दिनांक : २३.०४.२०२४**

**(डॉ. प्रदीप व्यास)**
**राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई**

State Information Commission
सत्यमेव जयते
Greater Mumbai